


# बसवंत गार्डन : भारतातील पहिले ॲपी तसेच ॲग्री टुरिझम सेंटर

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथे 'पूर्वा केमटेक' आणि 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या सहयोगाने अभिनव असे 'बसवंत हनी बी पार्क- मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र' तसेच 'बसवंत कृषी उद्योग पर्यटन केंद्र' उभारण्यात आले आहे. देशातील पहिले ॲपी- ॲग्री टुरिझम सेंटर म्हणून या केंद्राची ओळख निर्माण झाली आहे. मधमाशीचे मानवी जीवनातील महत्त्व सर्वांपर्यंत पोहचवून तिचे संरक्षण व संवर्धन करणे, हा या प्रकल्पाचा बीजविषय आहे. मधमाशी पालनाच्या माध्यमातून पिकांची उत्पादन वाढ तसेच स्वयंरोजगार निर्मितीतून शाश्वत ग्रामविकासाची संकल्पना येथे रंजक व अभ्यासपूर्ण स्वरुपात साकारण्यात आली आहे.

या केंद्रात वर्षभर विविध परिसंवाद व चर्चासत्रे आयोजिली जातात. त्यात राज्यस्तरीय 'मधुक्रांती' परिसंवाद, हनी बी फेस्टिवल, बसवंत फळ महोत्सव, द्राक्ष आणि किशमिश महोत्सव, मुख्याध्यापक/ प्राचार्य परिषद, पर्यटन महोत्सव तसेच इतरही अनेक उपक्रम राबविले जातात. बसवंत हनी बी पार्कमध्ये शेतकरी, विद्यार्थी तसेच बेरोजगार युवकांसाठी सर्व सुविधायुक्त बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यमातून युवक तसेच शेतकऱ्यांना प्रशिक्षित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध

## बैलांच्या भव्य शिल्पांची पार्श्वभूमी साऱ्यांनाच मोहून टाकते...



**'बसवंत गार्डन'ला भेट देण्यासाठी आलेल्या पर्यटकांसह 'पूर्वा केमटेक'चे संचालक श्री. विजय पवार आणि सौ. रोहिणी पवार.**



**‘बसवंत गार्डन’मधल्या ससेपालन केंद्रात रमून गेलेले शाळकरी विद्यार्थी...**

करून दिल्या आहेत. भारतातील या पहिल्या ‘ॲपी टुरिझम सेंटर – बसवंत मधमाशी उद्यानाची’ स्थापना २०१९ मध्ये तर ‘बसवंत कृषी–उद्योग पर्यटन केंद्रा’ची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली.

बसवंत मधमाशी उद्यानातील विशेष आकर्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

‘बीनी’ आणि ‘बीनिव्हर्स’(सेल्फी पॉईंट), मधमाशीच्या जीवनक्रमाचा माहितिपट, मधमाश्यांची वसाहत (ॲपिअरी) येथे उभारण्यात आली आहे. गावातील सर्व शेतकरी एकत्र येऊन कशा प्रकारे मधमाशी पालन करु शकतात हे समजण्यासाठी ‘मधमाश्यांचे गांव’ ही संकल्पना मांडली आहे. या व्यतिरिक्त आग्या मधमाशी प्रतिकृती, बी–प्लँट नर्सरी– सीड बँक, मधमाशीच्या संदर्भातील विविध पुस्तकांचे खुले वाचनालय, ग्रामीण भागातील संस्कृती आणि मधमाशीचे कार्य वारली पेंटिंगच्या माध्यमातून समजावून देणारा विभागही आहे. येथील आर्ट गॅलरीत बांबू पेंटिंग, पॉट पेंटिंग, स्टोन पेंटिंग अशी आकर्षणे आहेत. याबरोबरच येथील खाद्यपदार्थ आणि विक्री विभागात आऊटलेट आणि कॅफे, मधुबन फूडकोर्ट, विसावा, सोव्हिनिअर शॉप, गेम झोन कॅफे अशा विविध सुविधा आहेत.

बसवंत कृषी–उद्योग पर्यटन केंद्रात ‘गांव समृद्ध, तर देश समृद्ध’ ही महत्त्वाची विचारधारा अधोरेखित करणाऱ्या ‘सेवरगांव’ या स्वयंपूर्ण आदर्श गावाची (मिनिएचर व्हिलेज) संकल्पना प्रतिकृतीद्वारे मांडली आहे. अलिकडे प्रक्रिया उद्योगांतून रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होते. यासाठी एक मध्यम स्वरूपाचे फूड प्रोसेसिंग युनिट, मध प्रक्रिया युनिट तसेच चॉकलेट फॅक्टरी येथे उभारून प्रशिक्षणाची सोय देखील केली आहे. द्राक्षांची माहिती, बेदाणा निर्मिती प्रक्रिया आणि विविध प्रकारच्या बेदाण्यांची मांडणी येथे केली आहे.

ग्रामीण भागातल्या बहुतांश लोकांच्या उदरनिर्वाहाचं सजीव साधन असणाऱ्या कृषी आधारित बैल–संस्कृतीची परिपूर्ण ओळख बसवंत गार्डनमध्ये मांडलेल्या बैलांच्या शिल्पाकृतींमधून नवीन पिढीला अतिशय रंजक करून दिली जाते. भारतातील बैलांच्या विविध जातींच्या हुबेहूब प्रतिकृती त्यांच्या माहितीसह



**'बसवंत गार्डन'मधल्या गेम झोनमध्ये मुलांना विविध खेळांचा असा मन:पूर्वक आनंद लुटता येतो...**

येथे बघायला मिळतात. बैलसंस्कृतीचे एका छताखाली उभारण्यात आलेले अशा प्रकारचे एकमेव पर्यटन स्थळ अशी या केंद्राची ख्याती होत आहे. याबरोबरच क्रीडांगण- गेम/ स्पोर्ट्स झोन, फळांचे मॅस्कॉट, ससे पालन, टुक-टुक व्हॅन इत्यादी विविध आकर्षणांचा यात समावेश आहे. देशभरातून येथे शेतकरी, नागरी पर्यटक, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो आहे.

या कृषिपूरक, स्तुत्य उपक्रमाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. त्याची फलश्रुती म्हणून बसवंत मधमाशी उद्यानाला गतवर्षी (२०२२) प्रतिष्ठित अशा इंटरनॅशनल सेंटर फॉर रिस्पॉन्सिबल टुरिझम या संस्थेतर्फे दिला जाणारा 'रिस्पॉन्सिबल टुरिझम अॅवॉर्ड' हा पुरस्कार मिळाला. या अंतर्गत 'नैसर्गिक वारसा आणि जैवविविधतेमध्ये पर्यटनाचे योगदान वाढवणे' या श्रेणीमध्ये बसवंत हनी बी पार्कला रौप्यपदकाने सन्मानित करण्यात आले. तसेच यंदा (२०२३) संस्था श्रेणीमध्ये 'बसवंत हनी बी पार्क'ला 'किर्लोस्कर वसुंधरा मित्र' पुरस्कार प्रदान करण्यात आला. याखेरीज इतरही काही पुरस्कार या प्रकल्पाला लाभले आहेत.

मधमाशी पालनाच्या संदर्भात ही एक प्रातिनिधिक स्वरूपात झालेली सुरुवात आहे. अॅग्री टुरिझम-अॅपी टुरिझम हे क्षेत्र परिसरातील शेतकरी बंधुभगिनींना 'कम्युनिटी टुरिझम' या दृष्टिकोनातून पूरक ठरेल हे निश्चित. हा प्रकल्प महाराष्ट्रातील कृषी पर्यटन क्षेत्राला पथदर्शक तसेच प्रेरक ठरेल. म्हणूनच तो अधिकाधिक उपयुक्त आणि शाश्वत व्हावा, यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करणार असल्याचा अभिप्राय 'पूर्वा केमटेक' आणि 'ग्रीनझोन अॅग्रोकेम'चे कार्यकारी संचालक तथा या संकल्पनेचे प्रवर्तक श्री. संजय पवार यांनी व्यक्त केला. ■